PUNE RESEARCH SCHOLAR ISSN 2455-314X
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY JOURNAL VOL 5, ISSUE 2

# थोर समाजसुधारक राजा राममोहन रॉय यांच्या कार्याचा अभ्यास

डॉ. संभाजी संतोष पाटील
श्री. शि. वि .प्र. संस्थेचे महाविद्यालय
शिंदखेडा जि. धुळे (महाराष्ट्र)

**प्रस्तावना :**

१६ व्या शतकाच्या उत्तरार्धात भारतात प्रबोधनाच्या युगास सुरूवात झाली. सामाजिक व धार्मिक क्षेत्रामध्ये सुरू झालेल्या प्रबोधनाच्या चळवळीने अखेर राजकीय क्षेत्रात प्रवेश केला त्याचा परिणाम म्हणून भारतीय स्वातंत्र्य चळवळीस प्रारंभ झाला. या काळातील धार्मिक व सामाजिक सुधारक हे पाश्चीमात्यांच्या उदारमतवादी विचारांनी प्रभावित झाले होते पण त्यांना पाश्चीमात्यांच्या विचारांचे आणि संस्कृतीचे अंधानुकरण त्यांना करावयाचे नव्हते प्राचीन भारताच्या संस्कृतीची मूल्य टिकविण्यासाठी त्यांनी प्रयत्न केलेत म्हणून या समाज सुधारकांनी आधुनिक पाश्चात्य विचारधारेचा स्विकार करीत असतांना भारतीय परंपेतील मुल्यांशी त्यांची सांगड घालण्याचा प्रयत्न केला असा प्रयत्न करणाऱ्या विचारवंतांमध्ये राजा राममोहन रॉय हे अग्रभागी होते. सामाजिक धार्मिक क्षेत्रात राजा राममोहन रॉय व न्या.रानडे अशा विचारवंतांच्या कार्यातुन दिसून येते. भारतीय राजकीय सामाजिक सुधारणांसाठी जी काही चळवळ करावयाची होती ती सनदशीर मार्गानेच असली पाहिजे यावर त्यांचा कटाक्ष होता. या उदारमतवादी नेमस्त विचारसरणीचे आद्यप्रवर्तक राजा राममोहन रॉय हे होते. धार्मिक आणि सामाजिक क्षेत्रात सुरू झालेल्या सुधारणा चळवळीने अखेर राजकीय क्षेत्रात प्रवेश केला आणि भारताच्या स्वातंत्र्य चळवळीस प्रारंभ केला. प्राचीन भारतीय संस्कृतीतील चांगली मुल्ये टिकविणे व ती रूजविणे गरजेचे होते. अशा प्रकारचा प्रयत्न खऱ्या अर्थाने राजा राममोहन रॉय यांनी केल्याचे आढळून येते. म्हणूनच रविंद्रनाथ टागोर यांनी राजा राममोहन रॉय यांच्या विषयी म्हटले आहे "आपल्या व्यक्तीमत्वाच्या क्रियाशील सामर्थ्याने अढळ स्वातंत्र्य निष्ठेने राजा राममोहन रॉय यांनी देशाला सृजन शिलतेची आवश्यकता पटवून दिली. देशात नवचैतन्य निर्माण केले आणि त्याला स्वयंपुर्णतेचा मार्ग दाखविला" या विधाना वरून राजा राममोहन रॉय हे आधुनिक भारताचे शिल्पकार होते. त्यांनी आपल्या आयुष्यात अत्यंत नेटाने, तळमळीने, ध्येयवादाने, सामाजिक, राजकीय, धार्मिक क्षेत्रामध्ये सुधारकांच्या भूमिकेतुन जे काम केले ते फार मोलाचे व उपयुक्त आहे. त्यांच्या विचारांचे दर्शन त्यांनी जे बंगाली, इंग्रजी, पार्शियन, संस्कृत, उर्दु भाषेत विपूल लिखाण केलेले आहे. त्यात दिसून येते ही त्यांची साहित्य निर्मिती पुढील पिढयांना दिलेली मौलिक देणगी आहे.

- **संशोधनाची उद्दिष्टये** :-

(१) संशोधनाची उदिटये.

१. राजा राममोहन रॉय यांच्या कार्याची माहीती जाणुन घेणे.

२. राजा राममोहन रॉय यांनी दोषाच्या प्रगतीसाठी केलेल्या कामांची माहीती करून घेणे.

३. राजा राममोहन रॉय यांचे राजकीय व सामाजिक विचार जाणुन घेणे.
४. रॉय यांनी समाजप्रबोधनासाठी केलेल्या प्रयत्नांची माहीती जाणुन घेणे.

- **शोधनिबंधाची उद्दिष्टये** :-

थोर समाजसुधारक राजा राममोहन रॉय यांच्या कार्याचा अभ्यास करणे' हा प्रस्तुत शोधनिबंधाचा उद्देश आहे.

१. **संशोधन पध्दती** :-

समाजिक शास्त्रामध्ये व्यक्ती विषयक संशोधन कार्याविषयी संशोधन करतांना ती व्यक्ती ज्या कालखंडामध्ये होऊन गेली. त्यावेळेस त्या व्यक्ती विषयीचे लिखान संदर्भ म्हणुन तपासावे लागतात. यासाठी ऐतिहासिक दस्तऐवज, नोंदी तपासणे आवश्यक असते यासाठी ऐतिहासिक पध्दतीचा वापर करावा लागतो. राजा राममोहन रॉय यांच्या कार्य अभ्यासतांना त्या काळातील नोंदी, इतरांनी त्यांच्या कार्याविषयी नांदविलेली मते, विचार, घडलेल्या घडामोडी यांची माहीती ऐतिहासिक साधनांद्वारे प्राप्त केली आहे. तसेच या लघुशोध निबंधासाठी संदर्भ ग्रंथ, मासिके, पुस्तके, इंटरनेट या साधनांचा वापर करण्यात आला आहे.

**विषयाचे महत्व** :-

राजा राममोहन रॉय हे थोर समाजसुधारक होते. हिंदुसमाजातील मध्ययुगीन प्रवृत्तींशी त्यांनी प्रखरपणे लढा दिला. यासाठी त्यांनी सर्व धर्माच्या शिकवणुकीचा तौलनीक अभ्यास केला. त्यांनी अतिमानवी शक्ती, जादु टोना इत्यादी. भ्रमाचा निरास करण्याचा प्रयत्न केला. १८८५ मध्ये त्यांनी आत्मीय सभेची स्थापना केली कुलीनतेच्या बुरख्याआड मुलींची विक्री करण्याची जी घृणास्पद प्रथा होती तिचा व जातीभेदाचा पाडाव करणे हे सभेचे उद्दिष्ट होते. त्यांनी हिंदु धर्मातील मुर्तीपुजा, आंधळया श्रध्दा व खुळचट प्रथा या विरूध्द कार्य केले ते अध्यात्मीक विचारसरणीचे होते. हिंदु धर्माची मुलतत्वे न गमवता इस्लामची एकेरांची कल्पना, उपनिषदातील आत्मज्ञानाचा सिध्दांत, येशु ख्रिश्तांची नैतीक शिकवण आणि भारतात उदयाला आलेल्या भक्ती संप्रदायाच्या संतानी शिकविलेला भक्ती मार्ग या सर्वाचा समन्वय साधण्याचा प्रयत्न रॉय यांनी केला. विश्वबंधुत्वाच्या चळवळीतुन ते स्वातंत्र्य या मुल्याकडे पहात असल्याने त्यांच्या विचारांनी धर्म, वर्ण अथवा द्वेष याची सिमा बंधने नव्हती स्वातंत्र्यावरील श्रध्देमुळेच राजकारणाकडे पाहण्याचा त्यांचा दृष्टिकोन विशाल मानवतावादी बनलेला होता.

**राजा राममोहन रॉय यांचे राजकीय विचार** :-

राजा राममोहन रॉय हे दादाभाई नौराजी, गोपाळकृष्ण गोखले, सुरेंद्रनाथ बॅनर्जी यांच्या सारखे राजकीय धुरंधर नेते नव्हते. पण त्याच बरोबर ते राजकारणाचे अभ्यासक व युरोप मधील आणि त्यातही विशेषतः इंग्लंडमधील राजकरणाचे प्रवाह जाणणारे होते. त्यामुळेच राजकीय व प्रशासकीय प्रश्नासंबंधी त्यांनी व्यक्त केलेले विचार भारतीयांमध्ये राजकीय जागृती निर्माण करणारे व भारतीय राष्ट्रवादाचे बीजारोपण करणारे ठरले म्हणुनच सुरेंद्रनाथ बॅनर्जी यांनी रॉय यांचे वर्णन ''भारतातील सनदशीर व घटनात्मक चळवळीचे निर्माते'' असे केले आहे.

१. **व्यक्ती स्वातंत्र्याचा पुरस्कार** : रॉय यांची मानवी स्वातंत्र्याच्या कल्पनेवर उत्कट अशी निष्ठा होती. विचार आणि अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य हा वेद उपनिवदातील हिंदु तत्वज्ञानाचा गाभा आहे. जीवनाच्या विविध क्षेत्रात त्यांनी महत्वाचे कार्य केले व्यक्तीस स्वातंत्र्य मिळावे ही त्या मागची प्रेरणा होती. धार्मिक क्षेत्रात मुर्तीपुजा आणि कर्मकांड यांना विरोध, सामाजिक क्षेत्रात सतीच्या चाळीस आणि बहुपत्नी पध्दतीला विरोध, शैक्षणिक क्षेत्रात आधुनिक पाश्चात्य शिक्षणाचा पुरस्कार आणि राजकीय क्षेत्रात वृत्तपत्र स्वातंत्र्य आणि महिलांच्या हक्कांची मागणी

तसेच शासनाचे कार्यकारी अधिकार आणि न्यायदानाचे अधिकार यांची फारकत करण्याची मागणी हे त्यांचे कार्य म्हणजे स्वातंत्र्याच्या मागणीचेच विविध अविष्कार होत. धार्मिक सामाजिक, राजकीय अन्यायातुन जुलुमातुन समाजाची मुक्तता व्हावी आणि त्याला स्वातंत्र्य लाभावे हेच या सर्व कार्यामागील सुत्र होय. १८२७ मध्ये ब्रिटिष सरकारने एक 'ज्युरी बिल' मंजुर केले त्यानुसार हिंदु अगर मुस्लीम व्यक्तीला ज्युरी म्हणुन काम करण्यास प्रतिबंध करण्यात आला. यामुळे न्यायपालीकेच्या क्षेत्रात धार्मिक कारणांवरून भेदाभेद निर्माण झाला म्हणुन रॉय यांनी त्या बिलास जोरदार विरोध केला आणि त्या निमित्ताने न्यायालयीन कामकाजाबाबत त्यांनी काही सुधारांची मागणी केली. (१)नविन कायदयाची निर्मितीपुर्वी लोकमत लक्षात घेतले पाहीजे. (२) कंपनीच्या सनदी सेवेमध्ये अधिकाधिक भारतीय लोकांची भरती केली पाहीजे. (३) महसुल कमीशनर आणि न्यायाधीश यांची कार्यालये परस्परांपासुन स्वतंत्र असावीत. (४) ज्युरी पध्दत सुरू करण्यात यावी. (५) न्यायालयीन कामकाजाची भाषा पारषी ऐवजी इंग्रजी असावी.

२. **नागरी हक्क** : लॉक, थॉमस पेन यांच्या प्रमाणेच राजा राममोहन रॉय यांचा नैसर्गिक हक्कांवर विश्वास होता. व्यक्तीस जीवीतीचा, मुक्तसंचार करण्याचा हक्क असावा. तसेच नैतीक हक्काचा पुरस्कारही त्यांनी केला आहे. व्यक्ती स्वातंत्र्य याचा अर्थ केवळ कृतीचेच स्वातंत्र्य नसुन विचारांचेही स्वातंत्र्य मिळाले पाहीजे. रॉय यांचे स्पष्ट मत होते की, ''भारतीय लोकांना ब्रिटिशांनी नागरी हक्क मिळवुन दिले होते याचे कारण हे राज्यकर्ते उदारमतवादी होते. नागरी हक्कांमध्ये धार्मिक हक्क, जगण्याचा हक्क संपत्तीचा हक्क, शिक्षणाचा हक्क ,मत स्वातंत्र्यांचा हक्क इत्यादी येत असल्याने राज्यकर्त्यांनी हे हक्क प्रस्थापित केले पाहीजेत आणि ते प्रस्थापित झाले नसतील तर ते जनतेने केले पाहीजेत असे त्यांचे मत होते.

३. **लेखन आणि मुद्रण स्वातंत्र्य** : रॉय यांनी लेखन व मुद्रण स्वातंत्र्याचा पुरस्कार केलेला दिसुन येतो. मानवाच्या प्रगतीसाठी आणि त्यांच्यातील असमानता दुर करण्यासाठी वर्तमानपत्रांना महत्वाची भुमिका पार पाडावी लागते. त्यांनी स्वतःच 'संवाद कौमुवी' हे बंगाली भाषेतील वृत्तपत्र सुरू केले होते तसेच 'मरित उलअख-बार हे फार्सी भाषेतील नियतकालीक आणि ठतींउंपबंस डंहंपदम हे इंग्रजी भाषेतील नियतकालीकांचे संपादनही त्यांनी केले. १८२३ मध्ये गव्हर्नर जनरल जॉन ॲडम्स यांनी एक वटहुकुम काढुन वर्तमानपत्रासाठी वर्तमानपत्राच्या मालकांना सरकारकडुन परवाने घ्यावे लागतील असे जाहीर करण्यात आले यामुळे वृत्तपत्र स्वातंत्र्यावर मर्यादा येऊन सरकारी अधिकाऱ्यांना जास्त सत्ता मिळणार होती हा वटहुकुम रद्द करावा यासाठी राजा राममोहन रॉय, गौरीचरण बॅनर्जी, हरिचद्र घोष, प्रसन्नकुमार टागोर यांनी सर्वोच्च न्यायालयात अर्ज दाखल केला होता. अर्ज फेटाळल्यानंतर राजाच्या कौन्सीलकडे पुर्नविचारासाठी विनंती अर्ज करण्यात आला. त्या अर्जातील विषय असे (१) हया वटहुकुमामुळे ज्ञानाचा विकास आणि मानसिक प्रगती होणे बंद पडेल (२) हिंदुस्थानातील ब्रिटिशांची सत्ता स्थापन झाल्यापासुन हिंदुस्थानातील लोक हा हक्क अगर स्वातंत्र्य वापरीत आलेले असुन त्याचा अयोग्य वापर त्यांनी केला नाही. हा हक्क नष्ट झाल्यास लोकांना सुरक्षितता वाटणार नाही. या स्वातंत्र्याचा गैरवापर केल्यास सध्या अस्तीत्वात असलेल्या कायदयानुसार पुरेशी शिक्षा करता येईल. (३) हिंदुस्थानातील सरकारी अधिकाऱ्याच्या चुका आणि अन्याय हया बाबतची माहीती साम्राज्य सरकारला कळविता येणे कठीण होईल.
(४) सत्ताधिश अधिकाऱ्यांना मुद्रण स्वातंत्र्य अगर वृत्तपत्र स्वातंत्र्य म्हणजे आपल्या अधिकारावर नको असलेले नियंत्रण असे वाटत असते सरकारच्या विरोधी त्याचा वापर केला जाईल अशी भिती त्यांच्या मनात होती पण वृत्तपत्र स्वातंत्र्यामुळे जगाच्या कोणत्याही भागात क्रांती झाली नाही. या उलट मुद्रण स्वातंत्र्याच्या अभावी अशा

तक्रारींना वाचा न फोडता आल्यामुळे अनेक क्रांत्या झालेल्या आहेत. हि विनंती अर्ज फेटाळल्याने त्याचा निषेध म्हणुन राजा राममोहन रॉय यांनी 'मिरत उल उखबार' हे नियतकालिक बंद केल.

४. **कायदा आणि न्यायपध्दत** : राजा राममोहन रॉय हे न्यायपंडीत नव्हते तरी कायदयाच्या मुलभुत तत्वांच त्यांना ज्ञान होते. रॉय यांनी कायदे विषयक दोन पुस्तीकाही लिहील्या होत्या. (१) भारतीय महिलांच्या वारसा हक्काचे समर्थन करण्यासाठी धर्मग्रंथात सांगितलेल्या महिलांच्या हंक्कावर आधुनिक काळात आणल्या गेलेल्या बंधनासंबंधी होती. (२)दुसरी पुस्तिका बंगालच्या वैयक्तीक कायदयातील हिंदुंच्या संपतीच्या हक्काबद्दल होती. कायदा म्हणजे सार्वभौम सेवेची भाषा असते आणि कायदयाची निर्मिती भावना विरहीत आणि विचारपुर्वक अशी व्हावी लागत असल्याने ईस्ट इंडिया कंपनीच्या सरकारतील अधिकाऱ्यांनी कायदे करण्यापेक्षा इंग्लंडच्या पार्लमेंटने अगर बादशहाने ते करावे हे योग्य असे कायदे हिंदुस्थानासाठी करण्याच्या वेळी हिंदुस्थानातील सरकारी अधिकाऱ्यांप्रमाणेच, बौध्दीक आणि आर्थिक दृष्टया वरील असणाऱ्या लोकांची मते कायदयाच्या मसुदयाच्या प्रती त्यांना पाठवुन मागवुन घ्यावीत त्यामुळे लोकमत काय आहे हे कळु शकेल.हिंदुस्थानातील कायदे मंडळांनी कायदे करण्याइतकी हिंदी लोकांची त्याबाबतीत प्रगती झालेली नसल्यामुळे त्यांच्या प्रतिनिधीकडे कायदे करण्याची जबाबदारी सोपवु नये हिंदुस्थानातील सर्व साधारण लोकांमध्येही कायदयाबाबत मतप्रदर्शन करण्याइतकी पात्रता आली नसल्याने ब्रिटनच्या कायदेमंडळाने कायदे करावेत तसेच एकच कायदा सर्वांना लागु करण्यात यावा अशा प्रकारचे विचार राजा राममोहन रॉय यांनी मांडलेले आहेत.

रॉय यांनी कायदेमंडळी, कार्यकारी मंडळ आणि न्यायमंडळ एकमेकांपासुन अलग व स्वतंत्र असावीत त्यातुन न्याय व्यवस्थेचे स्वातंत्र्य सहजपणे राखता आले पाहीजे. असा विचार मांडला होता. सनदी नोकरांची भरती करतांना शिक्षण आणि वय विचारात घेतले पाहीजे. २२ वर्षाखालील व्यक्तीची सनदी सेवक म्हणुन नेमणुक करण्यात येवु नये. न्याय देणारे अधिकारी आणि जनता यांची भाषाएकच असावी. जनतेच्या भाषेत बोलणारे अधिकारी नेमले नाहीत तर न्यायदानात अडथळे येवुन न्यायव्यवस्था कार्यक्षम होवु शकत नाही. न्यायालयाच्या कामांवर लोकांची देखरेख असावी न्यायालयाचे कामकाज पाहण्यासाठी लोकांना न्यायालयात उपस्थित राहता यावे. न्यायालयाच्या कामाला वृत्तपत्रातुन प्रसिध्दी दिली पाहीजे. भारतातील पुर्वीच्या पंचायत पध्दतीचे पुनरूज्जीवन करावे. सेवानिवृत्त न्यायाधीश अनुभवी व्यक्ती,वकील यांचा समावेश पंचांच्या यादीत करावा, या यादीतील आवश्यक तेवढे पंच निवडुन घेऊन त्यांच्या सहाय्याने न्यायदानाचे कार्य केले जावे. न्यायाधीशांना भरपुर वेतन दिले पाहीजे. न्यायदानाचे कार्य कमी खर्चात व कमी वेळात होईल अशी व्यवस्था करावी. वरिष्ठ न्यायालयाचे कनिष्ठ पातळीवरील न्यायालयांवर नियंत्रण असावे. रॉय यांनी न्यायपालिकेसाठी अनेक सुधारणा सुचविल्या होत्या.

५. **सरकारचे कार्य** : राज्याची कार्य शांतता रक्षण व संरक्षण एवढयापुरतीच मर्यादित असु नयेत असे रॉय यांनी स्पष्ट केले होते. व्यक्ती स्वातंत्र्याचे रक्षण करणे एवढेच नव्हे तर त्यांची वाढ करणे, शिक्षणाचा प्रसार करणे, अनिष्ठ रूढी प्रथापरंपरा नष्ट करणे, समाजाची प्रगती घडवून आणणे. इत्यादी स्वरूपाची कार्य राज्यांनी केली पाहीजेत. सरकारने व्यक्तीच्या स्वातंत्र्यात हस्तक्षेप न करता ते टिकविण्याचे काम करावे व्यक्तीचे हित व समाजाचे हित साध्य करण्यासाठी आवश्यक झाल्यास हस्तक्षेप करणे योग्य होईल. सामाजिक सुधारणा, शिक्षण याबाबतीत राज्यांने हस्तक्षेप केला पाहीजे. राजा राममोहन रॉय यांच्या दृष्टिने हिंदुस्थानात प्राचीन काळापासुन चालत आलेल्या तत्वाचा म्हणजे जनहित अगर लोककल्याण या तत्वाचा स्विकार राज्याने करावा. राज्यसंस्थेने

लोक कल्याणाच्या दृष्टिने आवष्यक ठरणाऱ्या सामाजिक, नैतिक, आर्थिक आणि राजकीय जबाबदाऱ्या पार पाडल्या पाहीजेत. राज्यांच्या स्वरूपाविषयी रॉय यांनी असे मत व्यक्त केले की, अनियंत्रीत राजेशाही, महाजनशाही आणि प्रत्यक्ष लोकशाही हे प्रकार अयोग्य असुन नियंत्रित अगर मर्यादित राजेशाही हा प्रकार योग्य वाटतो कारण त्यामुळे राजेशाही आणि लोकशाही या दोन्ही प्रकारचे कायदे मिळु शकतात.

६. **आंतरराष्ट्रीय सहकार्य** : रॉय हे मानवतावादाचे पुरस्कर्ते होते आणि मानवतेचा विकास होत गेल्यास अखिल मानव जातीचे एक कुटूंब प्रस्थापित करता येईल असे त्यांना वाटत होते. राष्ट्रवाद आणि आंतरराष्ट्रीयवाद ह्या दोहोत परस्पर विरोध नसल्यामुळे जर सर्व राष्ट्रांना एकाच पातळीवर आणता आले तर आतंरराष्ट्रीय सहकार्य आणि सहजीवन प्रस्थापित करता येईल. सर्व मानवजात ही एका कुटुंबाप्रमाणे असल्यामुळे निरनिराळे राष्ट्रे या कुटूंबाच्या शाखा मानता येतील. राजा राममोहन रॉय असे मानतात की मानवजात ही एक आहे. एका देशाचे दुसऱ्या देशाशी वैर असण्याचे काही कारण नाही. संपुर्ण जग हे अनेक राष्ट्रांमध्ये विभागले गेले असले तरी सर्व राष्ट्रांमध्ये सहकार्य, प्रेम असावे. देशा देशात मैत्रीचे संबंध प्रस्थापित करण्यासाठी देशादेशांनी विचारांचे आदान प्रदान केले पाहीजे. राष्ट्रा राष्ट्रांनी समजुतीने आपल्या प्रश्नांची सोडवणुक करावी मतभेद मिटविण्यासाठी आंतरराष्ट्रीय क्षेत्रात एखादया समितीची स्थापना केली पाहीजे.

**सामाजिक विचार** : राजा राममोहन रॉय यांच्या काळात हिंदु समाज रूढी परंपरा, धार्मिक अंधश्रध्दा, कर्मकांड जातीव्यवस्था यात गुरफटलेला होता. जो पर्यंत हिंदु धर्मातील प्रत्येक गोष्ट बुध्दी व विज्ञानाच्या आधारावर तपासुन योग्य असण्याचे सिध्द होत नाही तोपर्यंत तिचा स्विकार करू नये. त्यांनी सांगितलेली राजकीय व सामाजिक हिंदु धर्मामध्ये काही बदल करणे आवश्यक आहे. प्रचार करण्याच्या दृष्टीने त्यांनी कलकत्ता येथे १८१६ मध्ये वेदांत महाविदयालयाची स्थापना केली. याच काळात त्यांनी आत्मीय सभेची स्थापना केली. तरीही रॉय यांचे समाधान झाले नाही. शेवटी हिंदुधर्मात सुधारणा होण्यासाठी वेदातील शुध्द आणि सर्वमान्य सत्यावर आधारित नविन समाज रचनेची १८२८ मध्ये स्थापना केली या समाजाची कार्य पध्दती पुढील प्रमाणे होती.

(१) **मुर्तीपुजेला विरोध** : रॉय यांच्यावर इस्लाम, ख्रिश्चन, बौध्द धर्माचा प्रभाव असल्यामूळे त्यांनी हिंदु धर्मातील मुर्तीपुजेला विरोध केला. श्री. अविनाशी, अद्रश्य व अक्षय अशी विश्वचैतन्य शक्ती आपण परमेश्वर म्हणुन मानतो. तिची पुजा करण्यास कोणत्याही मुर्तीची गरज नाही व त्यासाठी कोणाचाही बळी देण्याची गरज नाही. असे त्यांचे मत होते. असे म्हणत की, या विश्वचैतन्य स्मरण करित असतांना केवळ अशा प्रार्थना म्हणाव्यात की, ज्यामुळे या सृष्टीनिर्मात्याचे ध्यान आपणास करावेसे वाटेल व ज्यामूळे दातृत्व, दयाबुध्दी व इतर सदगुण यांची वाढ होईल. अशा उपासनेतुन सर्व धर्माच्या व पंथांच्या माणसांमध्ये प्रेमाचे धागे बळकट होईल.

(२) **बहुपत्नीत्वास विरोध आणि विधवा विवाह** : संयुक्तीक कारण नसतांना बहुपत्नीत्व स्विकारणे या पध्दतीस त्यांचा विरोध होता मॉजिस्ट्रेटची अनुमती घेतल्याशिवाय दुसऱ्या लग्नास परवानगी दिली जाऊ नये. व मॅजिस्ट्रेटने शास्त्रनियमाचा आधार घेऊनच दुसऱ्या लग्नास परवानगी दयावी असे सुचविणे होते स्त्री वारसा हक्काच्या पुरस्काराचा त्यांनी प्रयत्न केला. त्यांनी असे दाखवुन दिले की पुर्वीच्या हिंदु शास्त्राप्रमाणे विधवेस तिच्या पतिच्या संपत्तीतील हिस्सा तिच्या मुळाच्या बरोबरीने दिला गेला होता. परंतु आधुनिक विधीनियम करणाऱ्यांनी हा हिस्सा कमी करत शुन्यावर आणुन ठेवला होता. त्यामुळे त्यांची अवस्था बिकट झाली. त्या सती जाण्याचे कारण

त्यांची आर्थिक परिस्थिती होय आणि त्यामुळे त्यांना अपमानही सोसावा लागत होता. विधवांचा पुनर्विवाह झाला पाहीजे असा उदारमतवादी दृष्टिकोन त्यांनी धरला नाही पण त्याच बरोबर विधवांना माणुसकीची वागणुक दिली पाहीजे.हे त्यांनी निक्षुन सांगितले. अनाथ व आर्थिक परिस्थिती बिकट असलेल्या विधवांना सामाजिक संरक्षण मिळावे म्हणुन कलकत्ता शहरातील श्रीमंत लोकांना आवाहन करून त्यांनी अशा विधवांना मदत करण्यासाठी एक संस्थाही काढली होती. सामाजिक एकतेच्या दृष्टिकोनातुन आंतरजातीय व आंतरधर्मीय विवाह झाले पाहीजेत. असेही त्यांचे मत होते. रॉय हे केवळ मौखीक उपदेष करणारे कृतीशुन्य विचारवंत नव्हते, हे ते धर्म मार्तडांचा व रचनास्नेही आणि नातलग याचा रोष पत्करून समुद्र पार करून इंग्लंडला गेले.

(३) **अंधश्रध्देस विरोध** :- राजा राममोहन रॉय यांनी हिंदु धर्मातील अनिष्ठ, रूढी, परंपरा यांना विरोध केला. अंधश्रध्देमुळे मनुष्य विवेकहीन होतो असे त्यांचे म्हणणे होते ज्या रूढी व श्रध्दा हया विज्ञान व विवेक यांच्या निकषावर टिकू शकत नाही. त्या नष्ट केल्या पाहीजेत असे प्रतिपादन रॉय यांनी केले.

(४) **जातीव्यवस्थेस विरोध** :- रॉय यांच्या काळात जातीव्यवस्थेने विकृत रूप धारण केले होते. जातीचा आधार वंशपरंपरागत मानण्यात येत होता. जातीच्या आधारे समाजात भेदभाव केले जात होते. काही जाती श्रेष्ठ मानल्या जात होत्या. तर काही जातींना समाजात स्थानच नव्हते. समाजात मोठया प्रमाणात विषमता निर्माण झाली होती. त्यामुळे समाजातील ऐक्य नष्ट झाले होते अशा परिस्थितीत हिंदु धर्मातील ऐक्य प्रस्थापित करण्यासाठी सर्व जाती समान आहेत. जातीचा आधार हा वंश नसुन गुण आहे. हिंदू धर्मातील जादीभेद नष्ट झाले तर धर्मात ऐक्य प्रस्थापित होईलच.

(४) **स्त्री बंधनास विरोध** :- तत्कालीन समाजव्यवस्थेत स्त्रियांचा दर्जा अतिशय हीन होता. तिला कोणत्याही प्रकारचे स्वातंत्र्य नव्हते. परंपरेच्या बंधनांनी स्त्रीला जखडुन टाकले होते. स्त्रीला कोणत्याही प्रकारची किंमत नव्हती. भारतात अनेक शतकांपासुन सुरू असलेली सती प्रथा होय. बालविवाह प्रथा सर्व दूर होती. स्त्रियांना शिक्षणापासुन वंचित ठेवण्यात आले होते. स्त्रीचे जीवन अर्थहीन मानले जात होते. सती प्रथेविरोधी संघर्ष करित असतांना रॉय यांना फार कष्ट सहन करावे लागेल. विल्यम बेंटीकने ती प्रथा रद्द केली. स्त्री स्वातंत्र्य आणि तिच्यावरील अन्याय अत्याचार दुर करण्याच्या व त्याविषयी वैचारिक मांडणी करून समाजप्रबोधनाचे कार्य रॉय यांनी केले. त्या अर्थानेच ते हिंदू समाज सुधारणेच्या चळवळीचे प्रवर्तक मानले जातात.

(५) **शिक्षण विषयक विचार** :- रॉय यांनी शिक्षण क्षेत्रातही भरीव योगदान दिले आहे ते सामाजिक जीवनात शासनाच्या हस्तक्षेप करण्याविरूध्द मग ते स्वयंप्रशासन असो अथवा परकीय शासन असो. परंतु केवळ विधीनियमांनी या सुधारणा होऊ शकतील असे त्यांना वाटत नव्हते. शिक्षणातील प्रगती व योग्य परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर या सुधारणा घडवून आणता येतील असे त्यांना वाटत होते. कोणती शिक्षण पध्दती देशाच्या दृष्टीने हिताची यासंबंधी त्यांनी पुर्वग्रह विरहीत चिंतन केले आणि आपली मते अत्यंत निर्भिडपणे मांडली. भारतात आज जी शिक्षणप्रणाली दिसते ती सुरू करण्यासाठी त्याकाळी राजा राममोहन रॉय यांना बराच संघर्ष करावा लागला. तेव्हा देशातील आजच्या उपलब्ध शिक्षणप्रणालीचे बरेच श्रेय रॉय यांच्याकडे जाते. रॉय हे आधुनिक पाश्चात्य शिक्षणाचे खंदे पुरस्कर्ते होते म्हणून त्यांनी भारतात पाश्चात्य शिक्षण पध्दतीचा पुरस्कार करून पारंपारीक पध्दतीला विरोध केला. पाश्चीमात्य राष्ट्रांनी आपल्या देशातील शिक्षण पध्दतीतील रसायनशास्त्र, भौतिकशास्त्र, गणित, पदार्थविज्ञान आणि तत्वज्ञान या विषयाच्या अभ्यासात प्रगती केली. रॉय यांना याची

जाणिव होती म्हणून भारताला देखील आपली प्रगती करावयाची असेल तर अश्वयुगीन पारंपारिक शिक्षणाचा त्याग करून आधुनिक तत्वावर आधारीत शिक्षण पध्दतीचा स्विकार केला पाहीजे. पाश्चात्य राष्ट्रांनी ज्याप्रमाणे वैज्ञानिक दृष्टीचा स्विकार करून निसर्गशक्तीचा उपयोग स्वतःच्या उपयोगासाठी करून घेतला. त्या प्रकारच्या दृष्टीने स्विकार करून आपणास प्रगती घडवून आणावी लागेल असे प्रतिपादन राजा राममोहन रॉय यांनी केले.

**मुल्यमापन** :- रॉय हे सर्वार्थाने खरे सुधारक व विचारवंत होते. त्यांचे विचार भव्य आणि दुरदृष्टी हे त्यांचे वैशिष्टये होते ते एक असामान्य दर्जाचे प्रज्ञावंत होते. त्यांच्या कर्तृत्वाला विविध असे पैलू होते. त्यांचे सामाजिक व राजकीय चळवळीतील कार्य संपूर्ण मानवजातीस मार्गदर्शक ठरणारे आहे ते आधुनिक भारताचे शिल्पकार होते. भारतात सामाजिक शैक्षणिक आर्थिक राजकीय या सर्व क्षेत्रात समानता स्वातंत्र्य मानवी हक्कांचा पुरस्कार केला या विचारातुन त्यांची आधुनिक दृष्टी स्पष्ट होते ते भारतीय प्रबोधनाचे आद्यप्रवर्तक होते त्यांनी आपल्या विचारातुन प्रबोधनाचे बीजारोपण केले होते. अंधश्रध्देत अडकलेला समाज त्यांनी पाश्चात्य शिक्षणाच्या प्रभावातुन मुक्त केला. व्यापक विचारांची दृष्टी दिली. जातीभेद, श्रेष्ठ कनिष्ठता हा भेदभाव पाश्चात्य शिक्षणातुन दुर करण्याचे काम त्यांनी केले. त्यांनी सर्व धर्माच्या एकतेसाठी आणि सामंजस्यासाठी फार मोठे प्रयत्न केले ते प्रखर बुध्दीवादी व बुध्दीप्रमाण्यवादी होते राजा राममोहन रॉय हे महान मानवतावादी होते. आंतरराष्ट्रीय शांतता विश्वबंधुत्वाचे विचार त्यांनी मानवतावादी दृष्टीनेच मांडले ते एक कृतीशील विचारवंत होते. बालविवाह, सतिप्रथा यासारख्या जाचक बंधनातुन भारतीय स्त्रीला मुक्त करण्यासाठी रॉय यांनी आंदोलन उभारले. भारतीयांना आधुनिक पाश्चात्य पध्दतीचे शिक्षण मिळण्यासाठी ते आग्रही होते त्यांनी विविध विषयावरील अनेक पुस्तके लिहीली त्यांच्या 'वेदान्त ग्रंथ' मुळे बंगाली गद्यलेखनाचा पाया घातला.

## संदर्भ सुची


(१) डॉ.बाचल वि.मा. — आधुनिक भारतीय राजकीय विचारवंत
प्रा.गोळवलकर स.म. — सुविचार प्रकाशन मंडळ, पुणे.

(२) प्रा.गोखले आर.एम. — आधुनिक भारतीय राजकीय विचारवंत
कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे.

(३) वराडकर र.घ. — भारतीय राजकीय विचारवंत
विद्या प्रकाशन, नागपुर.

(४) प्राचार्य डॉ.देवरे पी.डी. — भारतीय राजकीय विचार
डॉ.निकुंभ डि.एस. — प्रशांत पब्लीकेशन्स, जळगांव

(५) डॉ.पाटील वा.भा.. — प्राचीन व आधुनिक भारतीय
राजकीय विचारवंत
प्रशांत पब्लिकेशन्स, जळगांव.